ठाणे, सोमवार दि. २२ जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : ८५ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

अग्रलेख

**स्वबळ आणि राजकीय चाली**

विधानसभा निवडणूक एकत्र लढू, पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढणार असल्याचा इशारा अजित पवार गटाचे अध्यक्ष अजित पवार यांनी महायुतीला दिला आहे. ......पान २ वर

समाट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र समाट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे संपादक : चंद्रकांत भोईटे




'धर्मवीर २'चित्रपटाचा ट्रेलर लाँच

...पान ३ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**

सोने ७३,३४० | चांदी ८९,८५०

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



आपल्या पक्षात वादग्रस्त हिरॉईन घेतली पाहिजे. त्यानिमित्त का होईना पक्षाला लोकप्रियता मिळेल.

## गुरूर्ब्रम्हा गुरुर्विष्णु:, गुरुर्देवो महेश्वर: । गुरु: साक्षात् परं ब्रम्ह, तस्मै श्री गुरवे नम:



गुरुपौर्णिमा निमित्त ठाण्यातील राममारुती रस्त्यावरील गजानन महाराज मंदिरात भाविकांनी दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी केली होत. (छाया-मनोज सिंह)



गुरूपौर्णिमेच्यानिमित्ताने मुख्यमंत्री शिंदे यांनी दादर, शिवाजी पार्क येथील स्मृतिस्थळी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन केले.



गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने ठाण्यातील टेंभीनाका येथील आनंदआश्रमात वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि वंदनीय गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्रपणे अभिवादन केले. चाफ्याच्या फुलांच्या सुगंधा इतकाच त्यांचा आठवणींचा दरवळ कायम आमच्यासोबत रहावा अशी मनोकामना यासमयी व्यक्त केली.

यानंतर टेंभीनाका येथे आलेल्या शिवसैनिकांनी गुरुपौर्णिमेनिमित्त दिलेल्या शुभेच्छांचा स्वीकार केला. यावेळी खासदार नरेश म्हस्के, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी आमदार शिशिर शिंदे, विधानसभा प्रमुख हेमंत पवार, माजी परिवहन सभापती विलास जोशी, ज्येष्ठ नगरसेवक रवी पाटील, माजी नगरसेवक विकास रेपाळे, प्रवक्ते राहुल लोंढे, शिवसेना ठाणे जिल्हा महिला संघटिका सौ.मिनाक्षी शिंदे, माजी नगरसेविका सौ.नम्रता भोसले-जाधव तसेच शिवसेनेचे ठाण्यातील सर्व प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



गुरुपौर्णिमेनिमित्त माजी खासदार राजन विचारे यांच्यासह शिवसेना बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी टेंभी नाका येथील धर्मवीर आनंद दिघे यांच्या पुतळ्याला व शक्तीस्थळी धर्मवीर आनंद दिघे यांना अभिवादन केले.

# विधानसभा एकत्र, पण महापालिका स्वतंत्र लढणार

**पुणे : आगामी विधानसभा निवडणुकांसाठी महायुती आणि महाविकास आघाडीतील सर्वच पक्ष एकत्रितपणे निवडणुका लढवण्यावर ठाम आहेत. महायुतीकडून सध्या पक्षांचे मेळावे घेतले जात आहे, पण या मेळाव्यातूनही ते महायुतीचंच सरकार येणार, महायुतीच जिंकणार असल्याचा दावा करत आहेत. पुण्यात काल भाजप आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे मेळावे पार पडत असून पिंपरी चिंचवडमधील मेळाव्यातून अजित पवारांनी तुफान बॅटिंग केली. यावेळी, लोकसभा निवडणुका आपण एकत्र लढलो, आता विधानसभा निवडणुकाही एकत्रच लढणार आहोत. मात्र, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वतंत्र लढायच्या आहेत, अशी घोषणाच राष्ट्रवादीचे राष्ट्रीय नेते तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. त्यामुळे, महायुती ही केवळ विधानसभेपुरतीच असल्याचं स्पष्ट झालं असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात राजकीय पक्ष स्वतंत्र मैदानात उतरणार असल्याचं दिसून येतं.**

## अजित पवारांची पुण्यातून घोषणा



आज पिंपरी चिंचवड,पुणे शहर आणि ग्रामीण असे मेळावे घ्याय्याचे होते,पण ग्रामीण मेळावा होऊ शकला नाही, असे म्हणत अजित पवारांनी पिंपरीच्या मेळाव्यातील भाषणाला सुरुवात केली. आज गुरुपौर्णिमा आहे, मी सर्व गुरूंना वंदन करतो.काही अफवा पसरवल्या जातात,पुण्यात दीपक मानकर आणि पिंपरीमधील कार्यकर्ते सोबत आहेत. विकासासाठी आपण निर्णय घेतला,विरोध पक्षात राहून आंदोलन करुन विकास होत नाही, प्रश्न सुटत नाही. काहीजण गेले,त्यांना स्वातंत्र आहे. आपल्याला पुणे शहरात जोमाने काम करावं लागणार आहे, वेळ फार कमी आहे. आपल्या सगळ्या वरिष्ठ नेत्यांनी निर्णय घेतला आणि आपण इथपर्यंत पोहचलो. आज नगर दौरा आहे,चार ठिकाणी कार्यक्रम आहे, वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. (पान २ वर)

## थोडक्यात घडामोडी

### बेपत्ता महिला तपासात कुचराई, महिला पोलीस उपनिरीक्षक निलंबित

नवी मुंबई : बेपत्ता विवाहित महिला तपासप्रकरणी दिरंगाई केल्याप्रकरणी महिला पोलीस उपनिरीक्षक मीना वऱ्हाडी यांना निलंबित करण्यात आले आहे. नवी मुंबईतील एक विवाहित महिला ६ तारखेला घरगुती कारणांनी घरातून निघून गेली. तिच्या सासरच्या लोकांनी तिचा शोध घेतला. मात्र ती नातेवाईक परिचित आणि माहेरीही गेली नसल्याने तिचे पती आणि वडिलांनी पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार देण्यासाठी आले असता त्यांचा तात्काळ जबाब नोंद करून घेण्यात आला नाही. तसेच गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून बेपत्ता महिलेचा तपास चालू केला नाही. महिला बेपत्ताप्रकरणी तात्काळ कायदेशीर प्रक्रिया सुरू करणे आदेश असताना दिरंगाई केली.

हा अत्यंत बेजबाबदारपणा व हलगर्जीपणा असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. त्यामुळे नैतिक दृष्ट्या जनमाणसांमध्ये पोलीस दलाविषयी संभ्रम व संशय निर्माण करून पोलीस दलाची प्रतिमा जनमाणसांत मलीन केली आहे, असा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे, अशी माहिती पोलीस उपायुक्त पंकज डहाणे यांनी दिली.

बेपत्ता झालेली महिला शीळ फाटा येथील मंदिरात गेली होती. तिला चहातून गुंगीचे औषध टाकून तिच्यावर सामूहिक बलात्कार केला गेला, तसेच तिची निर्घृण हत्याही करण्यात आली होती. या प्रकरणी तीन आरोपींना अटक करण्यात आली होती. मात्र तिची बेपत्ता तक्रारीची वेळीच दखल घेतली असता पुढील प्रसंग गुदरला नसता, असा आरोप पीडित महिलेच्या नातेवाईकांनी केला.

■ शिक्षण हक्क अधिनियमानुसार

# शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी २५ टक्के आरक्षित जागांसाठी ९५९७ विद्यार्थ्यांची निवड

**शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ साठी 'शिक्षण हक्क अधिनियम' अर्थात 'आरटीई' अंतर्गत २५ टक्के आरक्षित जागांसाठीच्या सोडतीची निवड यादी (दिनांक २० जुलै २०२४) https://student.maharashtra.gov.in/admšportal या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. सोडतीनुसार ठाणे जिल्ह्यासाठी ६४३ शाळांमध्ये ९५९७ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.**




### पालकांना येणार संदेश

या सोडतीद्वारे शाळेमध्ये प्रवेशासाठी निवड झालेल्या बालकांच्या पालकांना त्यांनी नोंदणी केलेल्या मोबाईल क्रमांकावर सोमवार (दिनांक २२ जुलै २०२४ पासून संदेश (एसएमएस) येण्यास सुरुवात होईल.

### असा घ्या प्रवेश

प्रवेश मिळाल्याचा संदेश प्राप्त झालेल्या पालकांनी संकेतस्थळावर जाऊन प्रवेश पत्राची प्रिंट घ्यावी. प्रवेशपत्रावर दिलेल्या संबंधित तालुकास्तरीय पडताळणी समितीकडे आवश्यक कागदपत्रे आणि त्यांच्या छायांकित प्रति घेऊन जावे. समितीने प्रवेश निश्चित केल्यानंतर पालकांनी प्रत्यक्ष प्रवेशासाठी शाळेत जाणे आवश्यक आहे. तसेच पालकांनी केवळ एसएमएसवर अवलंबून न राहता संबंधित संकेतस्थळावर अर्जाची स्थिती या टॅबवर आपल्या पाल्याचा अर्ज क्रमांक टाकून त्याचा प्रवेश निश्चित झालेला आहे की नाही याची पडताळणी करून घ्यावी, असे आवाहन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी केले आहे.

**ठाणे** –आरटीई अंतर्गत दुर्बल, वंचित, शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासवर्ग घटकांकरिता विद्यार्थ्यांच्या घरापासून १ किलोमीटर अंतरावरील खासगी शाळेत २५ टक्के आरक्षित कोट्यातून मोफत प्रवेश दिले जातात.

त्यानुसार, ठाणे जिल्ह्यातील ६४३ पात्र शाळांमधील आरटीईच्या २५ टक्के मोफत प्रवेशासाठी ११३३९ जागा उपलब्ध आहेत. या प्रवेशासाठी पालकांनी महाराष्ट्र शासनाच्या https://student.maharashtra.gov.in/admšportal या संकेत स्थळावरून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले होते.

माननीय उच्च न्यायालय मुंबई यांनी जनहित याचिका व रिट याचिकेवर (दिनांक १९ जुलै २०२४) रोजी अंतिम निर्णय दिला आहे. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाच्या शिक्षण हक्क अधिनियमानुसार दुर्बल व वंचित घटकाकरिता २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची (पान २ वर)





# ठाण्यात चोऱ्या आणि घरफोड्याच्या विविध गुन्ह्यातील तीन आरोपींना अटक

**ठाणे – नौपाडा पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या घरफोडीच्या गुन्हयाचा तपास करताना नौपाडा पोलिसांनी पकडलेल्या आरोपीच्या चौकशीत त्याने घरफोडीच्या केलेल्या चोरीमधील १ लाख ५० हजाराचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश मिळाले. तर दुसऱ्या गुन्ह्यातील एका लॅपटॉप चोरट्यालाही अटक करून दोन लॅपटॉप हस्तगत केले. तर तिसऱ्या प्रकरणात नौपाडा पोलिसांनी महिला चोरटी(बबली) ला अटक करून तिच्याकडून १०९ ग्रॅमच्या सोन्याचा ७ लाखाचा ऐवज हस्तगत करण्यात नौपाडा पोलिसांना यश लाभलेले आहे.**

११ एप्रिल २०२४ रोजी डॉ. मुस रोडवरील एका दुकानात घरफोडी करून अज्ञात चोरट्याने ६० हजार रुपये रोख रक्कम चोरून नेल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करीत असतांना पोलिसांनी सुमारे २० ते २५ ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यातून चोरट्याची माहिती समोर आल्यानंतर नौपाडा पोलीस पथकाने आरोपीस नवी मुंबईच्या वाशीतून अटक केली. त्याची अधिक चौकशी केली. चोरट्याने नौपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत पाच वेगवेगळ्या ठिकाणी चोरी व घरफोडी केल्याची कबुली दिली. तपासादरम्यान आरोपीच्या ताब्यातून एक रिक्षा, पितळी गणेश मूर्ती, पितळी भांडी व रोख रक्कम असा एकूण १ लाख ५० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे तर चोरीच्या दुसऱ्या घटनेत नौपाडा पोलिसांनी लॅपटॉप चोरणाऱ्या चोरट्यास नौपाडा पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. हेमंतकुमार हरिश्चंद्र शर्मा (३४)) रा. चुनाभट्टी, मुंबई याला अटक केली.

त्याच्या ताब्यातून ७५ हजार रुपये किंमतीचे दोन लॅपटॉप हस्तगत करण्यात आले. तर चोरीच्या तिसऱ्या घटनेत सोन्याचे दागिने चोरी करणाऱ्या (बबली)महिलेस नौपाडा पोलिसांनी अटक केली. तिच्याकडून चोरलेले दागिने हस्तगत केले. नौपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत दागिने चोरी झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. (पान २ वर)

## आज ना. अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस कळवा विभाग कार्यालय उद्घाटन आणि रुग्णवाहिका लोकार्पण सोहळ्याचे आयोजन



ठाणे - महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, ठाणे शहर (जिल्हा) - कळवा विभाग कार्यालयाचा उद्घाटन सोहळा आणि कळवा विभागासाठी मोफत रुग्णवाहीकेचा लोकार्पण सोहळा, सोमवारी, २२ जुलै रोजी, आयोजित करण्यात आल्याची माहिती प्रदेश प्रवक्ते, ठाणे व पालघर समन्वयक, ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे व प्रदेश सरचिटणीस, अल्पसंख्याक निरीक्षक नजीब मुल्ला यांनी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, ठाणे शहर (जिल्हा) - (पान २ वर)

# उदयोन्मुख खेळाडूंच्या भविष्यासाठी ठाणे जिल्ह्यात पायाभूत सुविधा उभारणार-अजिंक्य नाईक

**ठाणे – आज ठाणे जिल्ह्यातून अनेक खेळाडू घडत आहेत. उदयोन्मुख खेळाडूंच्या भविष्यासाठी मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यात अनेक पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देऊ, अशी ग्वाही मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्षपदाचे उमेदवार अजिंक्य नाईक यांनी दिली. मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या ठाण्यातील सभासद मतदारांशी अजिंक्य नाईक यांनी संवाद साधल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलतांना त्यांनी वरील ग्वाही दिली.**




यावेळी आमदार जितेंद्र आव्हाड, आमदार क्षितीज ठाकूर, माजी नगरसेवक विकास रेपाळे, मुंबई क्रिकेट असोसिएशनचे सहसचिव दीपक पाटील, कार्यकारणी सदस्य नीलेश भोसले, अभय हडप आदी मान्यवर उपस्थित होते.

१४ वर्षांखालील संघ असू दे किंवा रणजी ट्रॉफी असू दे मुंबईच्या संघात खेळण्यासाठी आज ठाणे जिल्ह्यातून अनेक खेळाडू येत आहेत. भारतासाठी खेळत असलेला तुषार देशपांडे सुध्दा ठाणे जिल्ह्यातून येतो.

ठाणे जिल्ह्यात चांगल्या पायाभूत सुविधा कशा देता येतील, जास्तीत जास्त स्पर्धा कशा भरवता येतील यावर आमचा भर असल्याचे अजिंक्य नाईक यांनी सांगितले. मढवी ट्रॉफी, १४ - १६ वर्षांखालील विविध स्पर्धा ठाणे जिल्ह्यात मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या माध्यमातून होत आहेत. रणजीपटू ठाणेकर तुकाराम सुर्वे यांच्या नावाने यावर्षी पासून ठाण्यात स्पर्धा भरविणार असल्याची माहिती अजिंक्य नाईक यांनी दिली.

ठाणे जिल्ह्यातील शहर असेल वा ग्रामिण भाग असेल या भागात अनेक स्पर्धा आम्ही सुरु करत आहोत. मैदानी क्रिकेट मुंबई क्रिकेटचा पाया आहे. मैदानी क्रिकेट जर चांगले करता आले तरच ठाणे जिल्ह्यातुन चांगले क्रिकेटर तयार होतील. खेळाडूंना आत्मनिर्भर करण्यासाठी जे बीसीसीआय मानधन देत आहेत तेच मानधन मुंबई क्रिकेट असोसिएशन देत असल्याचे अजिंक्य नाईक यांनी सांगितले. खेळाडूला सक्षम करणे, त्यांना नोकरी उपलब्ध करुन देणे यावर आमचा भर आहे. शासकीय आणि निमशासकीय सेवांमध्ये नोकरीसाठी आम्ही मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या माध्यमातून प्रयत्न करत आहेत. गेल्या २० महिन्यात ४० ते ५० जणांना आम्ही निमशासकीय सेवेमध्ये नोकरी लावली आहे. मा. शरद पवार, मा. मनोहर जोशी, मा. विलासराव देशमुख या माजी अध्यक्षांनी शासन आणि मुंबई क्रिकेट असोसिएशन यांच्यामध्ये समन्वयाचा चांगला पूल उभारला आहे. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या सहकार्यानेही पुढेही आम्ही चांगले काम करु असा आशावाद अजिंक्य नाईक यांनी व्यक्त केला.

# शिवसेना शिंदे गटाचे उप जिल्हाप्रमुख विष्णू चंदे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून उत्साहात साजरा





पडघा (भगवान चंदे) - जगात सर्वात मोठा धर्म कोणता असेल तर तो म्हणजे मानव धर्म... मानव सेवा हीच ईश्वर सेवा समजून अहोरात्र समाजसेवेचे व्रत चालवणारे मीनाक्षी फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा शिवसेना शिंदे गटाचे उप जिल्हाप्रमुख विष्णू शेठ यांनी मानव सेवा हीच खऱ्या अर्थाने ईश्वर सेवा आहे. समाजातील गोरगरिबांना केंद्रस्थानी ठेवून अहोरात्र सेवा करण्याचा संकल्प केला आहे.

मीनाक्षी फाऊंडेशनच्या माध्यमाने ठाणे जिल्ह्यातील तरुण तरुणींना एकत्र करून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यामचे आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी, महिलांना साडी चोळी वाटप, गोर गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, गोर गरीब जनतेला आधार कार्ड, पनकार्ड, रेशन कार्ड, उत्पन्न दाखला, जातीचा दाखला, अंधांना मदतीचा हात, अपंगांसाठी सायकल वाटप, अपघातात जखमींना उपचारासाठी मदत, रुग्ण वाहिनी पुरविणे, वृक्षारोपण करणे, स्वच्छ गाव, परिसर स्वच्छता अभियान राबविण्यात पुढाकार, रक्तदान शिबीर, आदी उपक्रम राबविण्यात अग्रेसर असलेल्या विष्णु शेठ चंदे यांनी आज १४ जुलै २०२४ रोजी आपला वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा
केला. वाढदिवसाच्या निमित्ताने महा आरोग्य शिबीर, महिलांसाठी हळदीकुंकू, विद्यार्थ्यांना वह्या वाटप, छत्र्या वाटप, आदि कार्यक्रम राबविण्यात आले. कांदळी ग्राम पंचायतीच्या सरपंच पदापासून पंचायत समिती
सदस्य, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सुकृत संचालक, शिवसैनिका पासून उप तालुका प्रमुख पदापासून उप जिल्हाप्रमुख, सध्या ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय मानले जातात. खासदार श्रीकांत शिंदे यांच्या विजयात उल्लेखनीय कामगिरी केली आहे.
दिवस रात्र समाज सेवेचे वेड असलेल्या विष्णू शेठ चंदे यांच्या वैशाली चंदे यांना जनतेने जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून दिल्यावर सेनेने त्यांची बांधकाम तथा आरोग्य सभापती पदावर सन्मानित केले होते. त्या अगोदर त्यांनी कांदळी ग्राम पंचायतीच्या सरपंच पदावर संधी दिली.

विष्णू शेठ चंदे यांच्या यशस्वी वाटचालीनंतर जनतेचे प्रेम, मतदाराच्या विश्वासाची भावना दडलेली आहे. जात धर्म भेदभाव न काम करण्याच्या पद्धतीमुळेच त्यांना बोरिवलीसारख्या मुस्लिम मोहल्ल्यात दुसऱ्या क्रमांकाची मते मिळतात ही त्याच्या कार्याची पोहोच पावती समजली जाते. विष्णू शेठ चंदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दिनांक १४ जुलै रोजी पंचक्रोशीतील बांधव व महिलांसाठी विविध उपक्रमाचे शिवसेना जनसंपर्क कार्यालय कांदळी, मुंबई नाशिक हायवे येथे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या प्रसंगी छत्री वाटप, गरीब मुलांना वह्यावाटप तसेच महिलांना हळदीकुंकू करून विविध घरगुती वस्तूचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रसंगी. माननीय प्रकाश पाटील (उपनेते शिंदे गट), आमदार शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघ) शिवसेना शिंदे गट) राम रेपाळे (स्थायी समिती सभापती, ठाणे महानगरपालिका), पंडित पाटील (ठाणे जिल्हा मजूर, फेडरेशन सहकारी संस्थेचे माजी चेअरमन), श्रीकांत गायकर (भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष ठाणे जिल्हा), ठाणे जि. प. माजी अध्यक्ष सुषमा लोणे, माजी सभापती ठाणे जिल्हा परिषद बांधकाम व आरोग्य विभाग, माजी सभापती वैशाली चंदे, आदिवासी एकात्मिक विकास महामंडळ ठाणे जिल्हा अध्यक्ष आशाताई मोरे, युवा नेते भिवंडी लोकसभा मतदारसंघ रवींद्र विशे (मनसे), महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष भगवान चंदे, कुणबी महोत्सव समितीचे माजी अध्यक्ष रविंद्र चंदे, तुषार निपुरत्ते, प्रदीप मते, कृषी उत्पन्न बाजार समिती भिवंडी चे माजी उपसभापती विष्णू पाटील, देवा ग्रुप अध्यक्ष सुजित ढोले (पप्प्याभाई), रुपेश सपाट (उद्योजक), राहुल पाटील (उद्योजक), प्रभुदास नाईक (युवासेना अध्यक्ष), तसेच युवा नेते ग्रामपंचायत डोहळे, कांदळी, तळवली, वांद्रे, भादाने आतकोली, पडघा ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच व सदस्य उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमास सहकार्य ठाणे जिल्हा
अध्यक्ष छावा संघटना अक्षय भोईर भाऊजी आणि ईतर योगदान विष्णू दादा चंदे समर्थक यांच्याकडून लाभले. याप्रसंगी माननीय मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी राबवलेली माझी लाडकी बहीण योजना या अंतर्गत जवळपास ५०० हून अधिक महिलांचे फॉर्म लॉगिंगेंन करून देण्यात आले.

## संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

### स्वबळ आणि राजकीय चाली

विधानसभा निवडणूक एकत्र लढू, पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढणार असल्याचा इशारा अजित पवार गटाचे अध्यक्ष अजित पवार यांनी महायुतीला दिला आहे. राज्यात आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने राजकीय वातावरण तापले आहे. भाजपाचे नेते अमित शाह यांनी विधानसभा निवडणुकीविषयी लक्षांच्या नेते, कार्यकर्त्यांना सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत. तसेच शरद पवार राज्यात सत्तेत आल्यास मराठा आरक्षण मिळणार नाही, असे पिल्लू त्यांनी सोडले आहे. पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा मेळावा उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच कसबा विधानसभा मतदारसंघात पार पडला आहे. पिंपरी - चिंचवड,पुणे शहर आणि ग्रामीण असे मेळावे घाय्याचे होते, पण ग्रामीण मेळावा होऊ शकला नाही, असे म्हणत अजित पवारांनी पिंपरीच्या मेळाव्यातील भाषणाला सुरुवात केली. आगामी विधानसभा डोळ्यांसमोर ठेवून राजकीय पक्षांनी आपापल्या पक्षांचे मेळावे घेऊन कार्यकर्त्यांना दक्ष राहण्याचे आवाहन केल्याचे दिसून येते. आगामी विधानसभा निवडणुकांसाठी महायुती आणि महाविकास आघाडीतील सर्वच पक्ष एकत्रितपणे निवडणुका लढवण्यावर ठाम आहेत. महायुतीकडून सध्या पक्षांचे मेळावे घेतले जात आहे, पण या मेळाव्यातूनही ते महायुतीचेच सरकार येणार, महायुतीच जिंकणार असल्याचा दावा करत आहेत. पुण्यात नुकतेच भाजप आणि अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे मेळावे पार पडले आहेत. पिंपरी चिंचवडमधील मेळाव्यातून अजित पवारांनी तुफान बॅटिंग केली. यावेळी, लोकसभा निवडणुका आपण एकत्र लढलो, आता विधानसभा निवडणुकाही एकत्रच लढणार आहोत. मात्र, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वतंत्र लढायच्या आहेत, अशी घोषणाच राष्ट्रवादीचे राष्ट्रीय नेते तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. त्यामुळे, महायुती ही केवळ विधानसभेपुरतीच असल्याचे स्पष्ट झाले आहे. अजित पवारांच्या मते विचार करायचा झाला तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात राजकीय पक्ष स्वतंत्र मैदानात उतरणार असल्याचे दिसून येते. असे झाले तर महायुतीचे नुकसान होणार असल्याचे दिसते. कारण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षीय विचार होत नसेल असे मानले तर हितसंबंध जोपासून निवडणुकीचे निर्णय घेतले जातात. राज्यातील सहकाराचे जाळे लक्षात घेतले तर काँग्रेस, दोन्ही राष्ट्रवादीचे पारडे जड वाटते. भाजपाने वेगळी खेळी करून निवडणुकीतील मतविभाजन केले तर महायुतीत फूट पडणार आहे. त्याचा लाभ अर्थातच भाजपाला होऊ शकतो. मेळाव्यात अजित पवार यांनी बोलताना पूर्वी सांगत होते, तेच सांगितले आहे. आज गुरुपौर्णिमा आहे, मी सर्व गुरूंना वंदन करतो. काही अफवा पसरवल्या जातात. विकासासाठी आपण निर्णय घेतला,विरोधी पक्षात राहून, आंदोलन करुन विकास होत नाही, प्रश्न सुटत नाही. काहीजण गेले,त्यांना स्वातंत्र्य आहे. आपल्याला पुणे शहरात जोमाने काम करावे लागणार आहे, वेळ फार कमी आहे. आपल्या सगळ्या वरिष्ठ नेत्यांनी निर्णय घेतला आणि आपण इथपर्यंत पोहचलो. अजित पवार यांनी लोकसभा निवडणुकीत राज्यात निवडून आलेले सदस्य पाहिले तर एकच आहे. भाजपाशी मैत्री करून त्यांच्या हाती काही लागले नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आपली ताकद असताना पुन्हा अपयश मिळू नये, यासाठी अजितदादांनी हा निर्णय घेतला असण्याची शक्यता आहे. अजितदादांनी म्हटले आहे की, अनेकजण पक्षात आले आहेत, त्यांचे स्वागत आहे. अंदाज आहे की, विधानसभा निवडणुका ऑक्टोबर शेवटपर्यंत किंवा नोव्हेंबर पहिला आठवड्यात होतील. पण हे सांगताना त्यांनी महायुतीला उद्देशून म्हटले की, लोकसभा- विधानसभा आपण एकत्र लढत असलो, तरी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आपण स्वबळावर लढायच्या आहेत. मेळाव्यात कार्यकर्त्यांसमोर अजित पवार यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महायुती एकत्र नसणार असल्याचे स्पष्ट केले आहे. सुसंस्कृत महाराष्ट्राची शिकवण यशवंतराव चव्हाण यांनी आपल्याला दिली आहे, असेही अजित पवार म्हणाले. विशाळगड येथे जे घडू नये ते घडले,कोर्टाने आदेश दिले,त्यांना आता मदत केली. सगळ्यांना न्याय मिळाला पाहिजे, जाती जातीमध्ये सलोखा राहिला पाहिजे, सर्वजण गुण्यागोविंदाने राहिले पाहिजे, असेही पवार यांनी म्हटले. मागील दोन वर्षांपासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या नाहीत. त्यामुळे प्रत्येक राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्याला या निवडणुका केव्हा होणार, असा प्रश्न पडला आहे. लोकसभा निवडणूक भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तीन पक्षांनी एकत्र येऊन लढवली. या निवडणुकीत महायुतीला अपेक्षित जागा जिंकता आल्या नाहीत. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणूक महायुतीमधील तीनही पक्ष स्वतंत्र लढतील अशी शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे. नुकतीच अजित पवार यांनी विधानसभा आणि स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत आपली भूमिका मांडली आहे. त्यामुळे महायुतीत संभ्रम होण्याची शक्यता आहे. पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मेळाव्यात म्हटले आहे की, अजित पवार यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना जनतेपर्यंत पोहोचवा. तसेच आगामी विधानसभा निवडणूक महायुती म्हणून लढणार आहोत, पण त्यानंतर होणार्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढणार असल्याची घोषणा त्यांनी केली. अजित पवारांचा सहकार क्षेत्रात वट असला तरी आत्तेची नाडी भाजपाकडे आहे. सहकारातील जुनी प्रकरणे काढून अनेक जणांना बेजार केलेल्या भाजपाला हे आव्हान मोडून काढणे अवघड नाही. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाबाबत भाजपा श्रेष्ठींना अजूनही विश्वास वाटत नाही. कारण अजित दादा केव्हा कोणता निर्णय घेतील हे सांगता येत नाही. असो. राजकारणातील नेत्यांचे वक्तव्य गंभीरपणे घ्यायचे नाही, असे म्हटले जाते. पण केव्हा दिलजमाई होईल तेही सांगता येत नाही. राजकारण हे अळवावरचे पाणी असते, असे म्हणतात ते खरे असावे.

**जाहिरातीसाठी एकमेव दै. 'महाराष्ट्र सम्राट'**

☆ मिळकट नोटीस ☆ हस्तांतर करार नोटीस
☆ नोंदणी न्यास नोटीस ☆ निविदा जाहिरातीसाठी
☆ तहसिल जाहीरनामा ☆ कामगार न्यायालय नोटीस
- दिलेल्या जाहिरात त्वरित प्रसिद्ध करणेसाठी एकमेव दैनिक महाराष्ट्र सम्राट
- शुभेच्छा / वाढदिवस जाहिरातीसाठी महाराष्ट्रातील प्रभावी दैनिकांपैकी एक म्हणजे महाराष्ट्र सम्राट

संपर्क : दै. महाराष्ट्र सम्राट, विक्रीकर कार्यालय शेजारी, गेट नं. ४, कलेक्टर कंपाऊंड, कोर्टनाका, ठाणे (प.) ४००६०१
☎ 022 - 25379944 , +91 - 9167957771

* पीआरबी कायद्यानुसार सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीनकक्षेच्या आधीन राहिल. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या / लेख / जाहिराती यांची जबाबदारी संबंधित वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यात राहिल.)

महाराष्ट्र सम्राट
*DISCLAIMER: Readers are requested to verify and make appropriate enquires to satisfy themselves about the veracity of an advertisement before responding to any published in this newspaper. The publisher & the owner of this newspaper, does not vouch for the authenticity of any advertiser's products and/ or services. In no event can the Owner, Publisher, Printer, Editor, Director's, Employees of this newspaper/ company be held responsible/liable in any manner whatsoever for any claims and/or damages for advertisments in the newspaper.

## लिचडे अँड डॉटर्स इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि. व टेक्नॉएज रिसर्च लॅबच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

### शहरातील गार्डन, धार्मिक स्थळ व शाळा आदी ठिकाणी कचराकुंडचे ही वाटप



अंबरनाथ (नवाज वणू) - लिचडे अँड डॉटर्स इन्फ्राप्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड व टेक्नॉएज रिसर्च लॅब हे अंबरनाथ पूर्वेकडील आनंदनगर येथे असून यांच्या सीएसआर ऍक्टिव्हिटी या फंडातून फॉरेस्टनाका येथे असणाऱ्या जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य वाटप व शहरातील विविध धार्मिक स्थळ, गार्डन आदी ठिकाणी एक पाऊल स्वच्छतेकडे या अनुषंगाने कचराकुंड वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन कंपनीच्या माध्यमातून करण्यात आले होते,

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून समाजसेवक अध्यक्ष शैलेश भोईर, समीर मगर, कंपनीचे डायरेक्टर अमित कुमार लिचडे, लॅबचे डायरेक्टर कल्याणी लिचडे, समाजसेवक अनिल तेलंगे, कंपनीचे डिजीएम विशाल कांबळे, लॅब हेड सतेश वाघचौडे, एच आर हेड स्नेहल पाचणेकर यांच्यासह अनेक मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते.

फॉरेस्टनाका येथे जिल्हा परिषदेची शाळा असून या शाळेत अनेक गरीब घराण्यातील विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यांची आर्थिक परिस्थिती नसल्याने त्यांना मदतीचा हातभार लागावा या हेतूने लिचडे अँड डॉटर्स इन्फ्राप्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड व टेक्नॉएज रिसर्च लॅबच्या संयुक्त विद्यमाने शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्याचे वाटप प्रमुख पाहुण्यांचे हस्ते करण्यात आले, त्याचबरोबर कंपनीच्या माध्यमातून शाळेला रंगरंगोटी देखील करून देण्यात येणार असून दरवर्षी आमच्या माध्यमातून जी काही मदत करणे शक्य असेल ती मदत करण्यात येणार असल्याचे कंपनीचे डायरेक्टर अमितकुमार लिचडे यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, एक पाऊल स्वच्छतेकडे या अनुषंगाने सर्वोदय गार्डन, सर्वोदय परिसर व शहरातील विविध ठिकाणी धार्मिक स्थळे व शाळा आदी ठिकाणी कचराकुंडाचे देखील वाटप करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी २५ टक्के आरक्षित जागांसाठी ९५९७ विद्यार्थ्यांची निवड

(पान १ वरून) दिनांक ७ जून २०२४ रोजी काढण्यात आलेल्या सोडतीची निवड यादी व प्रतिक्षा यादी शनिवारी, दिनांक २० जुलै २०२४ रोजी https://student.maharashtra.gov.in/admšportal या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. ठाणे जिल्ह्यातील एकूण ६४३ पात्र शाळांमध्ये एकूण १९५६८ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी ९५९७ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

## आज ना. अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यालय उद्घाटन आणि रुग्णवाहिका लोकार्पण सोहळ्याचे आयोजन

(पान १ वरून) कळवा विभाग कार्यालयाचा उद्घाटन सोहळा आणि कळवा विभागासाठी मोफत रुग्णवाहीकेचा लोकार्पण सोहळा, सोमवार, दिनांक २२ जुलै, २०२४ रोजी, सायंकाळी ६.०० वाजता आशर आर्या को. ऑप. हौ. सोसायटी, खारीगांव तलाव समोर, कळवा, जिल्हा ठाणे येथे संपन्न होणार आहे, अशी माहिती प्रदेश प्रवक्ते, ठाणे व पालघर समन्वयक, ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे व प्रदेश सरचिटणीस, अल्पसंख्याक निरीक्षक नजीब मुल्ला यांनी दिली आहे.

## ठाण्यात चोऱ्या आणि घरफोड्याच्या विविध गुन्ह्यातील तीन आरोपींना अटक

(पान १ वरून) नौपाडा पोलिसांनी सीसीटीव्ही आदींचा सखोल तपास करून एका संशयित महिलेस ताब्यात घेतले. तिच्याकडे केलेल्या चौकशीत महिलेने दागिने चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी महिलेला अटक करून तिच्या ताब्यातून सात लाख रुपये किमतीचे १०९ ग्रॅम सोन्याचे दागिने हस्तगत कार्नाय्त आल्याची माहिती नौपाडा पोलिसांनी दिली.

## विधानसभा एकत्र, पण महापालिका स्वतंत्र लढणार

(पान १ वरून) अनेकजण पक्षात आले आहेत, त्यांचं स्वागत करतो. अंदाज आहे की विधानसभा निवडणुका ऑक्टोबर शेवटापर्यंत किंवा नोव्हेंबर पहिला आठवड्यात होतील, असे अजित पवारांनी म्हटले. मात्र, त्यासोबतच, लोकसभा-विधानसभा आपण एकत्र लढत असलो, तरी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आपण स्वबळावर लढायच्या आहेत, अशी घोषणाच कार्यकर्त्यांसमोर अजित पवारांनी केली. त्यामुळे, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महायुती एकत्र नसणार असल्याचे स्पष्ट झालं आहे.

**जाती-जातीत सलोखा राहिला पाहिजे -** २००४ पासून मी पालकमंत्री म्हणून काम केलं, आरोप प्रत्यारोपला मी उत्तर देत नाही. मावळात पैसे गेले मावळात पैसे गेले अस बोललं जात होतं,आधी बारामती शिरूरला निधी दिला त्यावर कोणी बोलत नाहीत. सगळ्यां आमदार खासदारांना मी बोलू दिलं,कारण नसताना नेरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न केला जातो, असे म्हणत डीपीडीसीच्या बैठकीतील खासदार सुप्रिया सुळेंच्या आरोपावर अजित पवारांनी पलटवार केला. तसेच, मीडिया पुढे काही तरी वेगळं मांडण्यात आल,वडीलधाऱ्यांना बोलू दिलं जातं नाही अस सागितले. पण तसे काही नाही, सुस्कृत महाराष्ट्राची शिकवण यशवंतराव चव्हाण यांनी आपल्याला दिली आहे, असेही अजित पवार म्हणाले. विशाळगड येथे जे घडू नये ते घडलं,कोर्टाने आदेश दिले,त्यांना आता मदत केली.सगळ्यांना न्याय मिळाला पाहिजे, जाती जातीमध्ये सलोखा राहिला पाहिजे, सर्वजण गुण्यागोविंदाने राहिले पाहिजे, असेही पवार यांनी म्हटले.

**नवी मुंबई महानगरपालिका**

**शहर अभियंता विभाग**

**निविदा सुचना क्र:-/श.अ/26/2024-2025**

**कामाचे नाव :-** माझी वसुंधरा 1.0 अभियनाअंतर्गत नमुंमपा क्षेत्रातील विविध ठिकाणी सौर दिवाबत्ती, सौर ऑन ग्रीड सिस्टीम ई. सौर उर्जा उपकरणे लावणे.

**अंदाजित रक्कम रु. :- 2,66,79,827/-**

**इसारा अनामत रक्कम (रु.) :- 2,66,800/-**

**निविदा पुस्तीका ई-निविदा (E-tendaring) संगणक प्रणालीच्या** https://mahatenders.gov.in **या संकेत स्थळावर व नमुंमपाच्या** www.nmmc.gov.in **संकेत स्थळावर दिनांक- 22/07/2024 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण** https://mahatenders.gov.in **या संकेत स्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा** (E-tendering) **प्रक्रियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणींसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबर वर संकर्क करावे.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त , नवी मुंबई मानगरपालिका यांनी राखुन ठेवला आहे.**

सही/-
**( शिरिष गं. आरदवाड )**
**शहर अभियंता**
**नवी मुंबई महानगरपालिका**

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/88/2024

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सूचना

ठाणे महानगरपालिकेमार्फत "छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय कळवा येथील मुख्य पाण्याच्या टाकीमधील लोखंडी जिन्याची दुरुस्ती करणे व इतर स्थापत्य कामे करणे" या कामाकरिता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकीय/ निमशासकीय/ सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था/महानगरपालिका इ. यांनी शिस्तभंगाच्या कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे, अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर दि.२२/०७/२०२४ ते दि.२९/०७/२०२४ रोजीपर्यंत उपलब्ध असून, ऑनलाईन निविदा दि.२९/०७/२०२४ रोजी पर्यंत सायं.१६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा दि.३०/०७/२०२४ रोजी सायं. १६.३० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/सा.बा/१५२/२०२४-२०२५
दि.१९.०७.२०२४

**सही/-**
कार्यकारी अभियंता
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site www.thanecity.gov.in**

**BHIWANDI NIZAMPUR CITY MUNICIPAL CORPORATION**
**BHIWANDI (Dist. Thane)**
**MAHARASHTRA**
OLD S.T. STAND. KAP-ALI,
BHIWANDI - 421 302, DIST. THANE

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी,**
**जि.ठाणे, महाराष्ट्र,**
जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी
भिवंडी - ४२१ ३०२, जि. ठाणे

TEL : 02522- 55314/55315, FAX : 02522-25074

जा.क्र. /ज.सं.वि/७७७
दि. १९/०७/२०२४

**बांधकाम विभाग-प्र.स.क्र. ०३**

**प्रथम ई निविदा सुचना क्रमांक १७ /२०२४-२५**

भिवंडी निजामपूर शहर महानगपालिकेच्या बांधकाम विभाग मार्फत शासनाच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान निधी अंतर्गत खालिल नमुद कामांचे ई निविदा फॉर्म https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर विक्रीस उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी भि.नि.श.म.न.पा. नविन शासकीय इमारतीमधील ५ मजल्यावरील बांधकाम विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

**निविदा विक्री दि. २२/७/२०२४ ते दि. २९/७/२०२४**
**सादरीकरण दि. २९/७/२०२४**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १. | वॉर्ड क्रं. २१ मध्ये चंदन बाग परिसरामध्ये गटार बांधणे व पेव्हरब्लॉक बसविणे. | ९,९८,२०२/- | ५९०/- |
| २ | वॉर्ड क्रं. २१ साई प्रसन्न सोसायटी परिसरात सार्वजनिक शौचालय बांधणे. | २९,९९,८१७/- | ५९०/- |
| ३ | वॉर्ड क्रं. २२ मधील विविध परिसरात कॉंक्रिट रस्ता तयार करणे. | २९,९८,१७१/- | ५९०/- |
| ४ | वॉर्ड क्रं. २२ मध्ये विविध ठिकाणी गटार बांधणे. | २४,९७,३०२/- | ५९०/- |
| ५ | वॉर्ड क्रं. १६ मध्ये शास्त्रीनगर परिसरामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र बांधणे. | २९,९४,३२८/- | ५९०/- |
| ६ | वॉर्ड क्रं. १६ शास्त्रीनगर परिसरात सार्वजनिक शौचालय बांधणे. | २९,९७,३३४/- | ५९०/- |
| ७ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्रं. १७ मध्ये काबुकर ऑफीसच्या समोर सुशोभिकरण करणे व चौक बांधणे. | १४,९६,२००/- | ५९०/- |
| ८ | वॉर्ड क्रं. १७ मध्ये वॉटर सप्लाय कॉलनी परिरामध्ये समाज हॉल बांधणे. | २९,९७,८१०/- | ५९०/- |
| ९ | वॉर्ड क्रं. २१ मध्ये चैतन्य बिल्डींग परिसरामध्ये गटार बांधणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. | ९,९८,९५६/- | ५९०/- |
| १० | वॉर्ड क्रं. २३ गल्ली नंबर ५० परिसरामध्ये गटार बांधणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. | ९,९७,९०७/- | ५९०/- |
| ११ | वॉर्ड क्रं. २३ मध्ये हनुमान नगर परिसरात गटार बांधणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. | ९,९९,६३३/- | ५९०/- |

सही/-
(सचिन नाईक)
प्र. शहर अभियंता
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

## भारतीय सैन्य दल

■ पदाचे नाव तपशील:
पद क्र. पदाचे नाव पद संख्या
१ हवालदार - २ नायब सुभेदार -

■ क्रीडा पात्रता: ॲथलेटिक्स, तिरंदाजी बास्केटबॉल बॉक्सिंग, डायव्हिंग, फुटबॉल, तलवारबाजी, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, हँडबॉल, कबड्डी. ज्यांनी वर नमूद केलेल्या कोणत्याही खेळ आणि खेळांमध्ये खालीलप्रमाणे प्रतिनिधित्व केले आहे:- (E) व्यक्ती राष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करून कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर पदक विजेता असावी किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर (इंडल इव्हेंट) देशाचे प्रतिनिधित्व केले असेल. (ab) व्यक्तीने कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर (सांघिक स्पर्धा) राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्य किंवा देशाचे प्रतिनिधित्व केलेले असावे. (ac) वैयक्तिक खेळो इंडिया गेम्स आणि युथ गेम्समध्ये पदक विजेता असावा.

■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: १०वी उत्तीर्ण
पद क्र.२: १०वी उत्तीर्ण

■ वयाची अट: जन्म ०१ ऑक्टोबर १९९९ ते ३० सप्टेंबर २००६ दरम्यान झालेला असावा.

■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: Directorate of PT Sports General Staff Branch IHQ of MoD (Army) Room No 747 "A' Wing, Sena Bhawan PO New Delhi -110 011

■ अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४

■ वेबसाईट https://www.indianarmy.nic.in/

## स्टाफ सिलेक्शन कमिशन

■ Total: १७७२७ जागा

■ परीक्षेचे नाव: SSC संयुक्त पदवीधर स्तर परीक्षा २०२४

■ पदाचे नाव तपशील:
१ असिस्टंट सेक्शन ऑफिसर
२ असिस्टंट/असिस्टंट सेक्शन ऑफिसर
३ इस्पेक्टर ऑफ इनकम टॅक्स
४ इन्स्पेक्टर
५ असिस्टंट एनफोर्समेंट ऑफिसर
६ सब इंस्पेक्टर
७ एक्झिक्युटिव असिस्टंट
८ रिसर्च असिस्टंट
९ डिविजनल अकाउंटेंट
१० सब इंस्पेक्टर (CBI)
११ सब इंस्पेक्टर/जुनियर इंटेलिजन्स ऑफिसर
१२ कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी
१३ ऑडिटर
१४ अकाउंटेंट
१५ अकाउंटेंट /ज्युनियर अकाउंटेंट
१६ पोस्टल असिस्टंट / सॉर्टिंग असिस्टंट
१७ वरिष्ठ सचिवालय सहाय्यक / उच्च श्रेणी लिपिक
१८ सिनियर एडमिन असिस्टंट
१९ कर सहाय्यक
२० सब-इस्पेक्टर (NIA)

■ शैक्षणिक पात्रता:
कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी: पदवी व १२वीत गणितामध्ये किमान ६०% गुण किंवा सांख्यिकीसह कोणत्याही विषयात पदवी.

■ उर्वरित पदे: कोणत्याही शाखेतील पदवी.

■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: २० ते ३० वर्षे, १८ ते ३० वर्षे
पद क्र.२, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, ११: १८ ते ३० वर्षे
पद क्र.१०: २० ते ३० वर्षे
पद क्र.१२: १८ ते ३२ वर्षे
पद क्र.१३ ते २०: १८ ते २७ वर्षे

■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत

■ Fee: General/OBC: 100/- SC/ST/PWD

■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: २४ जुलै २०२४ (११:०० PM)
Tier I परीक्षा: सप्टेंबर/ऑक्टोबर २०२४
Tier II परीक्षा: डिसेंबर २०२४

■ अधिकृत वेबसाईट https://ssc.gov.in/

■ जागा : १५२

■ पदाचे नाव तपशील:
१ विद्याशाखांचे डीन
२ प्राध्यापक
३ सहयोगी प्राध्यापक / उप ग्रंथपाल
४ सहयोगी प्राध्यापक / सहयोगी ग्रंथपाल

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) संबंधित विषयात Ph.D. /55% गुणांसह पदव्युत्तर पदवी (ii) पुस्तके आणि संशोधन/पॉलिसी पेपर म्हणून १० प्रकाशने. (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) संबंधित विषयात Ph.D. (ii) पुस्तके आणि संशोधन/पॉलिसी पेपर म्हणून १० प्रकाशने. (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.३: संबंधित विषयात Ph.D+५५% गुणांसह पदव्युत्तर पदवी+ पुस्तक ०७ प्रकाशने+ ०८ वर्षे अनुभव+NET/SET किंवा ग्रंथालय विज्ञान/माहिती विज्ञान/दस्तऐवजीकरण विज्ञान पदव्युत्तर पदवी + ०८ वर्षे अनुभव
पद क्र.४: ५५% गुणांसह पदव्युत्तर पदवी+NET/SET किंवा ग्रंथालय विज्ञान/माहिती विज्ञान/दस्तऐवजीकरण विज्ञान पदव्युत्तर पदवी

■ नोकरी ठिकाण: मुंबई

■ Fee: खुला प्रवर्ग: ५००/- मागासवर्गीय: २५०/-

■ भरलेले अर्ज सादर करण्याचा पत्ता: The Registrar, University of Mumbai, Room No. 25, Fort, Mumbai-400032

■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०७ ऑगस्ट २०२४

■ वेबसाईट https://mu.ac. in/




## महाराष्ट्र अग्निशमन सेवा

■ उपलब्ध पाठ्यक्रम (कोर्स):
अ. क्र. कोर्सचे नाव पद संख्या कालावधी
१ अग्निशामक (फायरमन) कोर्स - ०६ महिने
२ उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी कोर्स ४० ०१ वर्षे

■ शैक्षणिक पात्रता:
अग्निशामक (फायरमन): ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण SC/ST/NT/VJNT/SBC/OBC/EWS: ४५%गुण
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी: ५०% गुणांसह पदवीधर SC/ST/NT/VJNT/SBC/OBC/EWS: ४५%गुण

■ शारीरिक पात्रता:
कोर्सचे नाव उंची वजन छाती
अग्निशामक (फायरमन) १६५ सें.मी. ५० kg ८१/८६ सें.मी
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी १६५ सें.मी. ५० kg ८१/८६ सें.मी

■ वयाची अट: १५ जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC/EWS: ०३ वर्षे सूट
अग्निशामक (फायरमन): १८ ते २३ वर्षे
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी: १८ ते २५ वर्षे

■फी : कोर्सचे नाव खुला प्रवर्ग राखीव प्रवर्ग
अग्निशामक (फायरमन) ६००/- ५००/-
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी ७५०/- ६००

■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: १५ ऑगस्ट २०२४
शैक्षणिक कागदपत्रांची तपासणी व शारीरिक पात्रता पडताळणी: २३ सप्टेंबर २०२४ पासून

■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.

■ अधिकृत वेबसाईट https://mahafireservice.gov.in/

## भारतीय हवाई दल

■ पदाचे नाव तपशील:
१ अग्निवीरवायु इनटेक

■ शैक्षणिक पात्रता: ५०% गुणांसह १२वी उत्तीर्ण (Mathematics, Physics and English) किंवा इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics / -utomobile / Computer Science / Instrumentation Technology / Information Technology) किंवा गैर-व्यावसायिक विषयासह दोन वर्षांचा व्यावसायिक अभ्यासक्रम उदा. Physics and Mathematics. किंवा ५०% गुणांसह १२वी उत्तीर्ण + ५०% गुणांसह इंग्रजी.

■ शारीरिक पात्रता:
उंची/छाती पुरुष महिला
उंची १५२.५ सेमी १५२ से.मी.
छाती ७७ से.मी./किमान ०५ सेमी फुगवून.

■ वयाची अट: जन्म ०३ जुलै २००४ ते ०३ जानेवारी २००८ दरम्यान.

■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत

■ Fee: ५५०/- + GST

■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: २८ जुलै २०२४

■ परीक्षा: १८ ऑक्टोबर २०२४ पासून

■ अधिकृत वेबसाईट https://indianairforce.nic.in/

## भारतीय स्टेट बँक

■ पदाचे नाव तपशील:
१ सेंट्रल रिसर्च टीम (Product Lead)
२ सेंट्रल रिसर्च टीम (Support)
३ प्रोजेक्ट डेवलपमेंट मॅनेजर (Technology)
४ प्रोजेक्ट डेवलपमेंट मॅनेजर (Business)
५ रिलेशनशिप मॅनेजर
६ तझ वेल्थ
७ रिलेशनशिप मॅनेजर (Team Lead)
८ रीजनल हेड
९ इन्वेस्टमेंट स्पेशलिस्ट
१० इन्वेस्टमेंट ऑफिसर

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) MBA/PGDM/PGDBM/C-/CF- (ii) ०५ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) पदवी/पदव्युत्तर पदवी (Commerce/ Finance/ Economics/Management/ Mathematics/Statistics) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) MBA/MMS/PGDM/ME/M. Tech./BE/B.Tech./PGDBM² (ii) ०४ वर्षे अनुभव
पद क्र.४: (i) MB-/PGDM/PGDBM² (ii) ०५ वर्षे अनुभव
पद क्र.५: (i) पदवीधर (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.६: (i) पदवीधर. (ii) ०६ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) पदवीधर. (ii) ०८ वर्षे अनुभव
पद क्र.८: (i) पदवीधर. (ii) १२ वर्षे अनुभव
पद क्र.९: (i) MBA/PGDM/PGDBM/CA/ CFA (ii) NISM 21- प्रमाणपत्र (iii) ०६ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) MA/PGDM/PGDBM/CA/ CFA (ii) NISM 21- प्रमाणपत्र (iii) ०४ वर्षे अनुभव

■ वयाची अट: ०१ एप्रिल २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: ३० ते ४५ वर्षे
पद क्र.२: २५ ते ३५ वर्षे
पद क्र.३: २५ ते ४० वर्षे
पद क्र.४: ३० ते ४० वर्षे
पद क्र.५: २३ ते ३५ वर्षे
पद क्र.६: २६ ते ४२ वर्षे
पद क्र.७: २८ ते ४२ वर्षे
पद क्र.८: ३५ ते ५० वर्षे
पद क्र.९: २८ ते ४२ वर्षे
पद क्र.१०: २८ ते ४० वर्षे

■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत

■ Fee: General/EWS: 750/- SC/ST/OBC/ PWD: फी नाही

■ अधिकृत वेबसाईट https://sbi.co.in/

## भारतीय सैन्य एनसीसी स्पेशल एंट्री स्कीम

■ कोर्सचे नाव: NCC स्पेशल एंट्री स्कीम एप्रिल २०२५-५७ कोर्स
पदाचे नाव तपशील:
१ NCC स्पेशल एंट्री (पुरुष) ७०
२ NCC स्पेशल एंट्री (महिला) ०६

■ शैक्षणिक पात्रता:
NCC "C' Certificate Holders: (i) ५०% गुणांसह पदवीधर (ii) ०२ वर्षे NCC मध्ये सेवा (iii) NCC प्रमाणपत्र.
Ward of Battle Casualties of Army Personnel: ५०% गुणांसह पदवीधर.
वयाची अट: जन्म ०२ जानेवारी २००० ते ०१ जानेवारी २००६ दरम्यान.

■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत

■ फी : फी नाही.

■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०९ ऑगस्ट २०२४

■ अधिकृत वेबसाईट https://indianarmy.nic.in/

# ‘धर्मवीर २’ चित्रपटाचा ट्रेलर लाँच

चित्रपटाच्या घोषणेपासूनच उत्सुकता निर्माण केलेल्या ‘धर्मवीर २’ चित्रपटाचा दमदार ट्रेलर नुकताच लाँच करण्यात आला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सुप्रसिद्ध बॉलीवुडस्टार सलमान खान, महाराष्ट्र भूषण अशोक सराफ, सचिन पिळगांवकर हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक कलाकारांची मांदियाळी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होती. साहील मोशन आर्ट्सचे मंगेश जीवन देसाई आणि झी स्टुडिओजचे उमेश कुमार बन्सल यांनी ‘धर्मवीर २’ या चित्रपटाची निर्मिती केली आहे. लेखन आणि दिग्दर्शनाची जबाबदारी प्रवीण तरडे यांनी निभावली आहे. चित्रपटाच्या टीजरला प्रेक्षकांकडून तुफान प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे चित्रपटाच्या ट्रेलरबाबत प्रचंड उत्सुकता होती.

२०२२ मध्ये ‘धर्मवीर २’ चित्रपटाचा पहिला भाग आला जो सुपरहिट झाला. दिघे साहेबांचे कार्य खुप मोठे आहे जे केवळ एका भागत दाखवणे शक्य नाही. दिघे साहेबांच्या पावलावर पाऊल नाही तर त्या पावलांवर जीव टाकून आम्ही काम करतो आहे. या चित्रपटात एक डायलॉग आहे ‘कार्यकर्त्ता घरात नाही तर लोकांच्या दारात शोभून दिसतो,’ कारण नेत्याने लोकांच्या सुख दुःखात, अडीअडचणीत त्यांच्यासोबत उभे राहावे. प्रसाद ओक यांनी साकारलेली भूमिका अप्रतिम आहे, जी साकारणे तेवढे सोप्पे नाही कारण त्यांचा दिघे साहेबांसोबत तसा कधी भेटण्याचा संबंध आला नाही. मागच्या भागापेक्षा या भागात माझी भूमिका साकारलेले क्षितीश दाते यांचे काम छान झाले आहे. पहिला सिनेमा जसा यशस्वी झाला त्यापेक्षाही हा. चित्रपट डबल हीट होईल अशा मी संपूर्ण टिमला शुभेच्छा देतो, असे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

गुरु पौर्णिमेच्या पूर्वसंध्येला दिघे साहेबांच्या जीवनावर आधारित ‘धर्मवीर २’ या चित्रपटाचा ट्रेलर लॉन्च करण्यात आला आहे. हिंदुत्वाशी गद्दारी करणाऱ्यांना क्षमा नाही ही चित्रपटाची टॅगलाईन जरी असली तरी शिंदेसाहेब असो किंवा आम्ही सर्व असू आमच्या जीवनाची टॅगलाईन सुद्धा हीच आहे. दिघे साहेबांच्या शिकवणी प्रमाणेच शिंदे साहेबांनी ज्याप्रमाणे महाराष्ट्राची धुरा समर्थपणे सांभाळली आहे. निश्चितच धर्मवीर आनंद दिघे साहेब आणि हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे स्वर्गातून आशिर्वाद देत असतील, कारण या दोघांनाही विचारांची गद्दारी मान्य नव्हती. मलाही सिनेमा काढायचा आहे पण अजुन थोडा वेळ आहे कारण मी जेव्हा सिनेमा करेन तेव्हा अनेकांचे मुखवटे फाटतील आणि खरा चेहरा बाहेर येईल. चित्रपटाचा ट्रेलर पाहून आता चित्रपट पाहण्यासाठी मी उत्सुक आहे, असे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

‘आपल्या संघटनेचा माज आहे तो भगवा रंग’ या वाक्यापासून सुरू होणारा धर्मवीर २ चित्रपटाचा ट्रेलर पहिल्या फ्रेमपासूनच आपल्याला गुंतवून ठेवतो. सर्वसामान्यांमध्ये राहणारे, सर्वसामान्यांसाठी झटणारे, भगव्यासाठी आणि हिंदुत्त्वासाठी लढणारे दिघेसाहेब पुन्हा एकदा या ट्रेलरमध्ये दिसतात. ‘तुझ्या आणि हिंदुत्त्वामध्ये मी जरी आलो, तरी मला बाजूला सारून हिंदुत्त्वाला मिठी मार’ या दिघे साहेबांच्या तोंडी असणाऱ्या डायलॉगने तर अंगावर काटा उभा राहतो. ट्रेलरमध्ये एकनाथ शिंदेही दिसतात. ‘धर्मवीर २’ चित्रपटाची टॅगलाइन ‘साहेबांच्या हिंदुत्त्वाची गोष्ट’ असल्याने आता या चित्रपटातून काय दाखवले जाणार याची उत्कंठा आता अधिकच वाढली गेली आहे.

‘धर्मवीर २’ चित्रपटात एकूण चार गाणी आहेत. गीतकार मंगेश कांगणे, स्नेहल तरडे, डॉक्टर प्रसाद बिवरे, विश्वजीत जोशी यांनी लिहिलेल्या गीतांना अविनाश - विश्वजीत आणि चिनार-महेश यांचे सुमधुर संगीत लाभले आहे. तर ही गाणी सुप्रसिद्ध गायक हरिहरन, जावेद अली, सुखविंदर सिंग, विशाल दादलानी, आदर्श शिंदे, मनीष राजगिरे सुप्रसिद्ध गायिका बेला शेंडे यांच्या सुमधुर आवाजात मराठी आणि हिंदी भाषांमध्ये स्वरबद्ध करण्यात आली आहेत. या चित्रपटातील चला करू तयारी या गीताने अल्पावधीतच रसिक श्रोत्यांची मने जिंकली असून लवकरच अन्य गाणी लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. ‘धर्मवीर २’ हा चित्रपट येत्या ९ ऑगस्टला मराठी आणि हिंदी या दोन भाषांमध्ये जगभरात प्रदर्शित केला जाणार आहे.

# रोजच्या आहारात कोथिंबीर वापरल्याने तुमच्या शरीरावर काय होईल परिणाम ?

भारतीय आहारात कोथिंबिरीचा उपयोग अनेक वर्षांपासून होत आहे. आपल्यापैकी बहुतेक लोकांच्या घरात कोथिंबीर हा घटक असतोच. स्वयंपाक करताना रोज लागणारा एक पदार्थ म्हणजे कोथिंबीर. बहुतेक घरात अन्नपदार्थांमध्ये कोथिंबीर वापरली जाते. भाजी, वरण कोणतंही असो. चटणी असो वा अन्नाची सजावट असो, त्यावर कोथिंबिरीची हलकीशी पेरणी केली की, त्या पदार्थाला कसा छान सुगंध येतो. कोथिंबिरीमुळे पदार्थाला एक वेगळीच चव येते. चवीव्यतिरिक्त अनेक आरोग्य फायद्यांच्या दृष्टीनेही कोथिंबिरीकडे पाहिले जाते. कोथिंबिरीमध्ये प्रोटीन, फॅट्स, कार्बोहायड्रेट, जीवनसत्त्वे असे अनेक पोषक घटक असतात. त्याव्यतिरिक्त कोथिंबिरीमध्ये कॅल्शियम, फॉस्फरस, आयर्न, केरोटीन, थियामीन, पोटॅशियम, असे अनेक खनिज घटकही असतात.

एका इन्स्टाग्राम हॅण्डलने पोस्ट केले आहे की, कोथिंबीर शरीरातून सरासरी ८७ टक्के शिसे, ९१ टक्के पारा व ७४ टक्के अ‍ॅल्युमिनियम काढून टाकू शकते. पण, हे खरे आहे का? याबाबत सेलिब्रिटी सौंदर्यतज्ज्ञ व त्वचाविज्ञानिक डॉ. मिक्की सिंग यांनी माहिती दिल्याचे वृत्त दी इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्यासंबंधी सविस्तर माहिती जाणून घेऊ.

डॉ. मिक्की सिंग म्हणाले, हे खरे आहे की, कोथिंबीर शरीरातून शिसे, पारा व ल्युमिनियम काढून टाकण्यास मदत करू शकते. कारण- ती शरीरात असलेल्या जड धातूंना सौम्य वा हलके करू शकते. मग शरीराकडून हे घटक त्याज्य म्हणून लघवीद्वारे बाहेर फेकले जातात. तसेच कोथिंबिरीमध्ये बुरशीनाशक, सूक्ष्म जीवविरोधी व दाहविरोधी क्षमतादेखील आहे.

कोथिंबीर खाण्यासाठी आरोग्यदायी असली तरी अधिक संशोधन आणि डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय जड धातूंपासून मुक्त होण्याचा तो सर्वोत्तम मार्ग असू शकत नाही. कोथिंबीर मानवी शरीरातून शिसे, पारा व ल्युमिनियम यांसारखे जड धातू काढून टाकण्यास मदत करू शकते ही संकल्पना वैज्ञानिक संशोधनाने दाखवून दिली आहे.

कोथिंबीर सेवनाने काही लोकांना खालील त्रास होण्याची शक्यता

**गॅस्ट्रोइंटेस्टायनल समस्या :** मोठ्या प्रमाणात कोथिंबीर खाल्ल्यास मळमळ, उलट्या, अतिसार किंवा पोटदुखीचा त्रास होऊ शकतो.

**औषधांमुळे समस्या :** कोथिंबीर काही औषधांची परिणामकारकता कमी करू शकते; जसे की रक्त पातळ करणे किंवा मधुमेहावरील औषधांची उपयुक्तता कमी होऊ शकते.

# पदकांची मालिका कायम राहण्याचा विश्वास




## पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कुस्तीगिरांच्या यशस्वी कामगिरीची योगेश्वर दत्तला खात्री

नवी दिल्ली : पॅरिसमध्ये भारतीय संघात महिला कुस्तीगीरांची संख्या अधिक असली, तरी या वेळीही कुस्तीतील ऑलिम्पिक पदकांची मालिका कायम राहील, असा विश्वास लंडन ऑलिम्पिकमधील पदकविजेत्या योगेश्वर दत्तने व्यक्त केला.

अमन सेहरावत (५७ किलो वजनी गट) हा एकमेव भारतीय पुरुष मल्ल आगामी पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्र ठरला आहे. महिला विभागात मात्र ऑलिम्पिकच्या सहा वजनी गटांपैकी पाचमध्ये भारताच्या कुस्तीगीर सहभाग नोंदवणार आहेत. यंदाच्या स्पर्धेत विनेश फोगट (५० किलो), अंतिम पंघाल (५३ किलो), अंशू मलिक (५७ किलो), निशा दहिया (६८ किलो) आणि रीतिका हुडा (७६ किलो) या भारताचे प्रतिनिधित्व करतील. केवळ ६२ किलो वजनी गटात भारताची महिला कुस्तीगीर ऑलिम्पिक पात्रता मिळवू शकली नाही.

‘‘बीजिंग ऑलिम्पिक २००८ मध्ये भारताने कुस्तीतील वैयक्तिक पदकांचा दुष्काळ संपवला होता. तेव्हापासून टोक्योपर्यंत प्रत्येक ऑलिम्पिक स्पर्धेत भारताने पदक मिळवले आहे. ही मालिका पॅरिसमध्ये कायम राहील असा मला विश्वास आहे,’’ असे योगेश्वरने सांगितले. तसेच बऱ्याच गोष्टी ‘ड्रॉ’ अर्थात सामने कोणाविरुद्ध होणार यावर अवलंबून असेल असेही योगेश्वरने नमूद केले. ‘‘भारतीय मल्लांना अनुकूल ‘ड्रॉ’ मिळाला, तर या वेळी कुस्तीत आपल्याला किमान तीन पदके मिळतील याची मला खात्री आहे,’’ असे योगेश्वर म्हणाला.

यंदा पॅरिस येथे होत असलेल्या ऑलिम्पिकपासून प्रथमच मल्लांना मानांकन देण्यास सुरुवात झाली आहे. यामध्ये भारताच्या अंतिम पंघालला चौथे, तर अमनला सहावे मानांकन मिळाले आहे. अंतिमचा वजनी गट आणि तिला मिळालेले मानांकन लक्षात घेता, थेट पदकाच्या लढतीतच तिच्यासमोर आव्हान उभे राहू शकते असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यापूर्वीचा तिचा प्रवास सोपा असू शकेल. अमनला मात्र जपान किंवा उझबेकिस्तानचा मल्ल पदकांच्या लढतीपूर्वी आव्हान देऊ शकतो.

‘‘ऑलिम्पिकमध्ये हॉकीनंतर कुस्तीपटूंनी भारताला सर्वाधिक पदके मिळवून दिली आहेत, याचा मला अभिमान आहे. वैयक्तिक क्रीडा प्रकाराचा विचार करायचा झाला, तर कुस्ती हा भारताचा सर्वोत्तम ऑलिम्पिक खेळ ठरतो. भारतीय मल्लांनी हे सिद्ध केले आहे आणि या वेळीही ते पदकांची कमाई करून दाखवतील,’’ असे म्हणत योगेश्वरने भारतीय कुस्तीगिरांना शुभेच्छा दिल्या.

ऑलिम्पिकच्या इतिहासात भारताला प्रथमच दुहेरी आकडा गाठण्यात यश येईल असे योगेश्वरला वाटते. या वेळी भारतीय संघ ऐतिहासिक कामगिरी करताना किमान १० पदके घेऊन परत येईल, असा अंदाज योगेश्वरने व्यक्त केला.

सुशील कुमार, योगेश्वर दत्त आणि रवी दहिया या ऑलिम्पिक पदकविजेत्यांप्रमाणेच अमन सेहरावतही दिल्लीतील प्रतिष्ठित छत्रसाल स्टेडियममधील कुस्ती अकादमीचा विद्यार्थी आहे. आता दिग्गजांच्या पावलावर पाऊल ठेवत पॅरिसमध्ये पदककमाईसाठी अमन सज्ज झाला आहे. ‘‘ऑलिम्पिक पदक जिंकणे हे स्वप्न आहे. छत्रसालने भारतीय कुस्तीला खूप दिग्गज मिळवून दिले आहेत. छत्रसालच्या विद्यार्थ्यांकडून ऑलिम्पिक पदक हीच अपेक्षा असते. ती पूर्ण करण्यासाठी मी खूप मेहनत घेत आहे,’’ असे अमन सेहरावत म्हणाला.

पालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांनी केली

# कल्याण रेल्वे स्थानक परिसरातील सॅटिस कामाची पाहणी

कल्याण : आज सकाळी महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांनी कल्याण रेल्वे स्थानकासमोर, स्मार्ट सिटी विभागामार्फत सुरू असलेल्या सॅटिसच्या कामाची पाहणी केली. आज पहाटेपासूनच कल्याण परिसरात होत असलेल्या अतिवृष्टीमुळे बहुमजली पार्किंग समोर पावसाचे पाणी साचले होते. महापालिकेच्या स्मार्ट सिटी विभागाच्या कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे यांनी दहा HP च्या एकूण तीन पंपांच्या सहाय्याने सदर पाण्याचा एका तासात निचरा केला.

सॅटिस कामांमध्ये कॅ. सुभाषचंद्र बोस चौक ते रेल्वे स्टेशन (दोन्ही बाजूने) तसेच रेल्वे स्टेशन ते बैल बाजार रस्ता या ठिकाणी ज्या अडचणी आहेत त्या अडचणी/ अडथळ्यांवर त्वरित कार्यवाही करून क्षेत्र उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

रेल्वे स्टेशन समोर रेल्वे विभागाने बाराशे मिमी व्यासाचा पाईप कल्याण डोंबिवली महापालिकेच्या सहाशे मिमी ड्रेनला जोडल्याने बहुमजली पार्किंग समोर पावसाचे पाणी साठले. या पाईपची पाहणी करून सदर पाईप मधून येणाऱ्या प्रवाहाची विल्हेवाट तांत्रिकदृष्ट्या करण्यासाठी रेल्वे विभागास कळविण्याबाबतही निर्देश महापालिका आयुक्त यांनी यावेळी दिले.

त्याचप्रमाणे सदर परिसरात इतरत्र पडलेला कचरा, फेरीवाले यांचेवर तीव्र कारवाई कटाक्षाने करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त यांनी क प्रभागाचे सहा आयुक्त तुषार सोनावणे यांना दिले.

रेल्वे स्थानकाजवळील सॅटिस प्रकल्पात जिथे जिथे अडचणी येत होत्या त्या ठिकाणी टीम समवेत स्पॉटनिहाय पाहणी करून त्या अडचणी दूर करण्याचे नियोजन केले असल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड यांनी यावेळी दिली.

या समयी परिमंडळ -१ चे उपायुक्त प्रसाद बोरकर परिमंडळ- २ उपायुक्त रमेश मिसाळ, स्मार्ट सिटीच्या कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे ,शहर विकासचे कार्यकारी अभियंता सुरेंद्र टेंगळे ,स्मार्ट सिटीचे उपअभियंता संदीप तांबे, ब प्रभागाच्या सहा. आयुक्त सोनम देशमुख व क प्रभागाचे सहा. आयुक्त तुषार सोनवणे उपस्थित होते.





# नालासोपाऱ्यात पाईप गॅस जोडणी करतांना स्फोट

वसई: नालासोपाऱ्यात पाईप गॅस जोडणी करण्याचे काम सुरू असताना स्फोट झाला आहे. शनिवारी संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास ही घटना घडली. यात दुर्घटनेत ४ जण होरपळले असून त्यात ३ कामगार आणि एका रहिवाशाचा समावेश आहे. नालासोपारा पूर्वेच्या गाला नगर येथील चंद्रेश हिल्स या इमारतीत गुजरात गॅस कंपनीचे गॅस जोडणीचे काम सुरू होते. शनिवारी सायंकाळी गुजरात गॅस कंपनीचे तीन मजूर त्याठिकाणी गॅस जोडणी करण्याचे काम करीत होते. मात्र गॅस पुरवठा होत असलेल्या वाहिनीची झडप (वॉल) बंद न केल्याने अचानक मोठा स्फोट झाला. या स्फोटात तीन कामगार आणि एक रहिवासी होरपळले आहेत. अंगद कुमार, विशाल कुमार आणि सतीश कुमार अशी जखमींची नावे असून त्यांना नालासोपारा येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. या घटनेची माहिती महापालिकेच्या अग्निशमन दलाला मिळताच घटनास्थळी पोहचून परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्याचे काम सुरू केले आहे.यापूर्वी नालासोपारा पूर्वेच्या आचोळे रोडवरील द्वारकाहॉटेल जवळ गुजरात गॅस वाहिन्यांचा स्फोट झाला होता. त्यात हॉटेलला लागलेल्या भीषण आगीत तीन जण जण होरपळले होते. शहरातील काही भागात गुजरात गॅस कंपनीतर्फे पाईप गॅस पुरवठा करण्यात येत आहे. मात्र गॅस जोडण्या देत असताना कामादरम्यान होत असलेल्या निष्काळजीपणामुळे सातत्याने अशा घटना समोर येत आहे. याशिवाय अनुभव व प्रशिक्षण दिलेले कर्मचारी ही कामासाठी ठेवले जात नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.



मुहूर्त गुरुपौर्णिमेचा आणि त्याचबरोबर ज्येष्ठ पत्रकार स्व.चंद्रशेखर वाघ यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून लेखक पत्रकार मनीष वाघ' यांच्या विश्लेषण नामक लेखन संग्रहाचे प्रकाशन समाजसेवक डॉ. राजेश मढवी यांच्या शुभहस्ते झाले. विश्लेषण लेखन संग्रह म्हणजे जणू बौद्धिक पोस्ट मार्टम असे डॉक्टरांनी वर्णन केले. कविता,पर्यावरण,समाजकारण,राजकारण अशा विविध विषयात वाघ यांनी बरीचशी पुस्तके लिहलेली आहेत. स्तंभ लेखन करताना समाजात घडणाऱ्या घटना,दुर्घटना शासन, प्रशासन यांचे निर्णय यावर वाघ हे परखड लेखन करतात आणि समाज मानसात प्रबोधन, जागृती करतात. सदर कार्यक्रमास साहित्यिक अँड. मनोज वैद्य(को.म. सा.प),निशिकांत महाकाळ, विनोद पितळे, मनोहर बापट, दामले,मिश्रा असे विभूती उपस्थित होते. सदर लेखन संग्रहाचे प्रकाशन सिद्धी फ्रेंड्स पब्लिकेशन या प्रकाशकाने केले.

# पनवेल ग्रामीण भागातील रस्त्यांचा होणार विकास

५० कोटी रुपयांच्या कामाला प्रशासकीय मान्यता;

आमदार प्रशांत ठाकूर यांची मागणी व पाठपुराव्याला यश

पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या मागणीनुसार पनवेल तालुक्यातील १४ रस्त्यांच्या विकासकामांना मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा २ अंतर्गत प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यामुळे जवळपास ५० कोटी रुपये खर्च करून या रस्त्यांची दर्जोन्नती होणार आहे.

त्यानुसार प्रजिमा १३ ते चिंचवली तर्फे तळोजा, शिरवली, वांगणी तर्फे तळोजा रस्ता, राज्य मार्ग १०३ ते वाजे, चेरवली वाजापूर पिंपळवाडी रस्ता, राज्य मार्ग १३ ते शांतीवन, भानघर, चिंचवली तर्फे वाजे रस्ता, वावंजे ते मानपाडा रस्ता, इजिमा २१ ते नितळस रस्ता, वाजे ते बकुळवाडी रस्ता, राज्य मार्ग ८५ ते कानपोली रस्ता, राज्य मार्ग १०३ ते खुटल्याचा पाडा (नेरपाडा) रस्ता, राज्य मार्ग ८५ ते हेदुटणे रस्ता, राज्य मार्ग १०३ ते सांगटोली रस्ता, राज्य मार्ग १०३ ते धोदाणी रस्ता, राज्य मार्ग १०३ ते बोनशेत रस्ता, धोदाणी ते चिंचवाडी रस्ता, राज्य मार्ग १०३ ते भोकरपाडा रस्ता या सर्व रस्त्यांचा विकास होणार आहे. या रस्त्यांच्या कामासाठी निधी देण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे केली होती. त्यांची मागणी आणि पाठपुराव्याने ५० कोटी रुपयांच्या या कामांना ग्रामविकास विभागाकडून प्रशासकीय मान्यता मिळाली असून तसा शासन निर्णय जाहीर करण्यात आला आहे. लवकरच या कामांची निविदा प्रसिद्ध होऊन या रस्त्यांच्या विकासकामाला सुरुवात होणार आहे. या मंजूरीबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन आणि राज्य सरकार व शासनाचे आभार मानले आहेत.

# फाऊंटन हॉटेल ते गायमुखपर्यंत रस्ता मिरा भाईंदर पालिकेकडे हस्तांतरित

आमदार प्रताप सरनाईक यांच्या पाठपुराव्यास यश ; दिवाळीत रस्ता रुंदीकरणाच्या कामाला सुरुवात होणार : आ. सरनाईक

भाईंदर : ठाणे-घोडबंदर राज्यमार्ग क्र.८४ वर फाऊंटन हॉटेल ते गायमुखपर्यंत रस्ता हा मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ता मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने हा रस्ता मिरा भाईंदर महापालिकेकडे हस्तांतरित केला असून तसे महापालिका आयुक्तांना कळवले आहे. महापालिकेच्या हद्दीत जवळपास साडेचार किमी इतका रस्ता येतो. हा रस्ता दुप्पट रुंद करण्याचे काम करायचे असल्याने रस्ता रुंदीकरणासाठी आता कामाला वेग येणार आहे , अशी माहिती आमदार प्रताप सरनाईक यांनी दिली. 'फाऊंटन हॉटेल ते गायमुख' पर्यंत भविष्याचा विचार करून रस्ता दुप्पट म्हणजेच ६0 मीटर रुंद करण्याची मागणी आमदार प्रताप सरनाईक यांनी वेळोवेळी केली होती व ही मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्य करून या रास्ता रुंदीकरणाच्या कामाच्या खर्चाचे अंदाजपत्रकही एमएमआरडीए अधिकाऱ्यांनी तयार केले आहे. एम एम आर डी एच्या माध्यमातून हा रस्ता विकसित केला जाणार आहे.

## टीडीआरचा मोबदला देणार

हा रस्ता दुप्पट रुंद म्हणजे ६० मीटर इतका करण्यासाठी भुसंपादन करावे लागेल आणि जमीन मालकांना मोबदला द्यावा लागेल. जमिनीचा मोबदला देण्याचे अधिकार हे महापालिकेला आहेत. हे काम लवकर व्हावे म्हणून ही तांत्रिक बाब समजून त्यामुळे महापालिकेकडे हा रस्ता तात्काळ हस्तांतरित केला गेला आहे. आता रस्त्यासाठी ज्यांची जमीन घेतली जाईल त्यांना आर्थिक स्वरूपात किंवा टीडीआरच्या स्वरूपात महापालिकेकडून मोबदला देणे सोपे जाईल , असे आमदार सरनाईक यांनी सांगितले.

## रस्ता रुंदीकरण काळाची गरज !

फाऊंटन हॉटेल ते गायमुखपर्यंत हा रस्ता अरुंद असून या रस्त्यात घाटात अनेक चढ-उतार, वळण असल्याने तेथे ट्राफिक जाम होत असतो. त्यात तासन्तास वाहन चालक अडकून पडतात. घोडबंदर मार्गावर वाहतूककोंडी नेहमीची झाली असल्याने रस्ता रुंदीकरण काळाची गरज झाली आहे. अवजड वाहनांचे अपघात घाटात होत असतात. ट्राफिक जामच्या नेहमीच्या समस्येमुळे वाहन चालक त्रस्त झाले आहेत. घोडबंदर रस्त्यावरील ट्रॅफिकवर कायमस्वरूपी पर्याय शोधा अशी लोकांची मागणी असल्याने आता रस्ता रुंदीकरण करण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील आहोत. हे काम एमएमआरडीएच्या माध्यमातून दिवाळीपर्यंत सुरु होईल , यासाठी सतत पाठपुरावा सुरु राहील , असे आमदार सरनाईक यांनी सांगितले.

फाऊंटन हॉटेल ते गायमुखपर्यंत या मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ता व सेवा रस्ता संबंधित महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात यावा अशी मागणी आमदार प्रताप सरनाईक यांनी केली होती. त्यानंतर हा रस्ता हस्तांतरित करण्यात यावा असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठकीमध्ये दिलेले होते. मुख्यमंत्री शिंदे यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील ठाणे-घोडबंदर रस्ता मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याबाबत आमदार सरनाईक यांचा सतत पाठपुरावा सुरु होता. मुख्यमंत्र्यांनी दिलेले आदेश व आमदार सरनाईक यांचा पाठपुरावा यामुळे नुकतेच सार्वजनिक बांधकाम विभागाने हा रस्ता हस्तांतरित करण्याचे पत्र मीरा भाईंदर महापालिका आयुक्तांना पाठवले आहे , असे ठाणे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे यांनी सांगितले.

'फाऊंटन हॉटेल ते गायमुख'पर्यंत साधारण साडेचार किलोमीटर रस्ता आहे. सध्या तो ३० मीटर इतका आहे. घाटात त्याची रुंदी कमी आहे. दिवसेंदिवस वाहनांची संख्या व वाहतूक कोंडी वाढत आहे. ठाणे घोडबंदर भाईंदर या रस्त्यावर ट्राफिकचे प्रमाण वाढत असून भविष्याची गरज लक्षात घेता या रस्त्याचे रुंदीकरण होणे आवश्यक आहे.

फाऊंटन हॉटेल ते गायमुख पर्यंत रस्ता सध्या ३० मीटर इतका आहे. सध्याची व भविष्याची गरज ओळखून हा रस्ता दुप्पट म्हणजे ६० मीटर इतका रुंद केला जावा अशी आमदार सरनाईक यांची मागणी मुख्यमंत्र्यांनी मान्य करून एमएमआरडीए ने हे रस्ता रुंदीकरणाचे काम सुरु करावे , प्रत्यक्ष पाहणी करून रस्त्याच्या कामाचे खर्चाचे अंदाजपत्रक आणि सविस्तर अहवाल सादर करावा असे आदेश मुख्यमंत्र्यांनी काही दिवसांपूर्वी दिले होते.

याबाबत आमदार सरनाईक यांची एमएमआरडीएचे आयुक्त डॉ संजय मुखर्जी , अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल यांच्यासोबतही बैठक झाली होती. हा रस्ता रुंद करण्याचे काम सुरु करण्यासाठी त्याच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम एमएमआरडीए कडून सध्या केले जात आहे. सगळी प्रक्रिया पूर्ण करून दिवाळीत रस्ता रुंदीकरणाचे काम सुरु करण्यासाठी प्रयत्न असतील , असे आमदार सरनाईक यांनी सांगितले.







मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच शिवसेना उपनेते दशरथ दादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत असताना कल्याण लोकसभेचे खा. श्रीकांत शिंदे यांच्या विशेष निधीमधून पारसिक नगर परिसरातील चिनार सोसायटी येथील ज्येष्ठ नागरिक कट्ट्याचे उद्घाटन करण्यात आले. तसेच मधुमालती-जाई जुई येथील लहान मुलांसाठी बांधण्यात आलेल्या नवीन उद्यानाचे उद्घाटन करण्यात आले. पारसिक नगर परिसरातील सिद्धेश्वर पार्क सोसायटी येथील ज्येष्ठ नागरिक कट्ट्याचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी मा. नगरसेवकउमेश पाटील, ठाणे शहरसंघटक नरेंद्र शिंदे, विभाग प्रमुख शाम पाटील उपविभाग प्रमुख रवींद्र पाटील, कळवा उपशहर प्रमुखराकेश पाटील, शाखाप्रमुखमहेश गवारी, शाखाप्रमुख निनाद बोराडे, रोहन शिंदे, जय पाटील, कळवा मुंब्रा सह संघटक रचना पाटील, महिला विभाग संघटक अर्चना पाटील, उपशाखा संघटना रेखा रहाटे, उपशाखा संघटक स्मिता आयरे आम्ही जेष्ठ नागरिक बी.जी.पाटील, गोसावी व अनेक ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. तसेच पारसिक नगर येथील ज्येष्ठ नागरिकांची ज्येष्ठ कट्टा व शालेय विद्यार्थी तसेच लहान मुलांची उद्यानाची मागणी पूर्ण करण्यात आली.







काश्मीर येथील झालेल्या दहशतवादी हल्याच्या निषेधार्थ तीव्र निदर्शन दिवा शहराच्या वतीने करण्यात आली. दिवा शहरप्रमुख सचिन पाटील ह्याच्या नेतृवाखाली ही निदर्शने करण्यात आली. यावेळी विधानसभा संघटिका योगिता नाईक, शहर संघटिका ज्योती पाटील, उपशहर प्रमुख तेजस पोरजी, शहर समन्विका प्रियांका सावंत, उपशहर संघटिका स्मिता जाधव, विभाग प्रमुख चेतन पाटील, मच्छिंद्र लाड, शनिदास पाटील, संजय जाधव, रवी रसाळ, विनाया कदम, युवा सेनेचे सुयोग राणे उपस्थित होते.

# संघर्ष आणि समन्वयातून शेकडो रहिवाश्यांना मिळणार गृह दिलासा

आ. संजय केळकर यांच्यामुळे रखडलेला पुर्नविकास दृष्टीपथात



ठाणे (गणेश भोईटे) : विकासकामधील अंतर्गत कलहामुळे ठाण्याच्या नौपाड्यातील अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थांचा पुर्नविकास बराच काळ रखडल्याने शेकडो रहिवाशी त्रस्त झाले होते.अखेर, आमदार संजय केळकर यांनी संघर्ष आणि समन्वयातुन रखडलेला पुर्नविकास दृष्टीपथात आणल्याने लवकरच शेकडो रहिवाश्यांना गृह दिलासा मिळणार आहे. या अनुषंगाने शुक्रवारी काही सोसायटयांना थकीत घरभाडयाचे धनादेश आ.केळकर यांच्याहस्ते वाटप करण्यात आले. दरम्यान, यामुळे पुर्नविकास रखडलेल्या ठाण्यातील सोसायट्यांसाठी हा एकप्रकारे रोडमॅप ठरेल.असा विश्वास आ.केळकर यांनी यावेळी व्यक्त केला.

ठाण्यातील मे.जोशी एन्टरप्रायजेस या कंपनीच्या भागिदारामधील अंतर्गत वादामुळे नौपाडा परिसरातील नवसोनाली,सहजीवन,नोबल, दर्शनी, सुजाता, रचना, अनामिका, नूतन आदी को-ऑप. सोसायट्यांच्या पुर्नविकास रखडला होता.पुर्नविकासाला दिरंगाई झाल्यामुळे धास्ती,चिंता सतावुन रहिवाशी देशोधडीला लागण्याची भीती व्यक्त होती. याबाबत रहिवाश्यांनी आ.संजय केळकर यांच्याकडे धाव घेतली होती. त्यानंतर आ. संजय केळकर यांनी शासन - प्रशासन स्तरावर पाठपुरावा केल्यामुळे मे.जोशी बिल्डर्सचे भागीदार डि.के.सिंग नमले. तसेच, शुक्रवारी आ. केळकर यांच्या उपस्थितीत या सोसायट्यांना थकीत भाड्यापोटी पहिल्या धनादेशाचे वाटप करण्यात आले.

ठाणे शहरामध्ये अनेक मोठे प्रकल्प रखडलेले असुन जवळपास ४ ते ५ हजार रहिवाशी त्रस्त आहेत. तेव्हा, या रहिवाश्यांचे हक्क अबाधित राहायला हवेत. ठराविक मुदतीत पुर्ण न होता गृह प्रकल्प रखडले असतील तर असे प्रकल्प टर्मिनेट करून इतर विकासकाकडे हस्तांतरीत करण्याची तरतुद हवी. अशी मागणी शासनाकडे केली असल्याचे आ. संजय केळकर यांनी सांगितले.

यावेळी बोलताना आ. केळकर यांनी, विकासकालाही अडचणी उदभवु शकतात, परंतु रहिवाशी हा केंद्रबिंदु मानुन विकासक व संबंधित यंत्रणांनी काम करणे गरजेचे असल्याचे सांगितले. ज्यांच्याशी संघर्ष होता त्यांनाच सोबत घेऊन समन्वयाच्या माध्यमातुन एकत्रित लढा दिल्यानेच हे यश लाभले असुन प्रत्येक रहिवाशी स्वतः च्या हक्काच्या घरामध्ये जाईपर्यंत पाठीशी राहिन, अशी ग्वाही आ. केळकर यांनी यावेळी दिली. याकामी ड. सुभाष काळे आणि विद्याधर वैशंपायन यांचेही सहकार्य लाभले. या धनादेश वाटप प्रसंगी शेकडोच्या संख्येने रहिवाशी उपस्थित होते, तर, व्यासपीठावर माजी नगरसेवक सुनेश जोशी, वास्तुविशारद संदीप प्रभु आदी मंडळी उपस्थित होती.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१